**सं.फौ.फौ.क्र.७१/२०२४**
**सरकार –वि– श्रीपत खरे**
**निशाणी क्र. २०**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर जबानी.</u>**

नांव – प्रविण भास्कर भुसाळ

वय – ३०

पद – पोलीस कॉन्स्टेबल

नेमणूक – वडनेर भैरव पोलीस स्टेशन नाशिक ग्रामीण

**<u>सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

१. दि.१०.०८.२०२३ रोजी मी वडनेर भैरव पोलीस स्टेशनला पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी मी पी.एस.आय. तागड व ए.एस.आय. जाधव असे पोलीस स्टेशनमध्ये हजर असतांना स.पो.नि. मयुर भामरे यांनी आम्हाला कळविले की, एक इसम नामे श्रीपत खरे रा. चिखलआंबे हा जिल्हा परिषद शाळेजवळ, भिंतीलगत मोकळ्या जागेत त्याच्याकडे असलेल्या दुचाकीवर एका बॉक्समध्ये देशी दारुची विक्री करत आहे. त्याच्यावर घटनास्थळी जावून कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत आम्हाला वरिष्ठांनी निर्देश दिले. ए.एस.आय जाधव यांनी दोन पंचांना बोलावून घेतले. त्यांना मिळालेल्या बातमीनुसार सर्व माहिती दिली. त्यांना आमच्यासोबत पंचनाम्यासाठी चला अशी विनंती केली. त्याला दोन्ही पंचांनी संमती दिली. पंचनाम्यासाठी लागणारे साहित्य घेवून खाजगी वाहनाने आम्ही घटनास्थळी रवाना झालो. चिखलआंबे गावामध्ये जावून मिळालेल्या बातमीची आम्ही खात्री करुन घेतली. तिथे एक इसम त्याच्या ताब्यात असलेल्या मोटारसायकलवर एका खाकी बॉक्समध्ये काचेची बाटली

समोरच्या इसमांना देत असतांना व त्यांच्याकडून पैसे घेत असतांना आम्हाला दिसला. बातमीप्रमाणे खात्री होताच आम्ही त्याच्यावर छापा टाकला. पोलीसांची चाहूल लागताच तो इसम त्याच्या ताब्यातील गाडी व खाकी रंगाचा बॉक्स टाकून घटनास्थळावरुन पळून गेला. त्याच्या ताब्यामध्ये देशी दारु प्रिंस संत्राच्या ४९ बाटल्या मिळून आल्या व बजाज कंपनीची मोटारसायकल मिळून आले. त्यानुसार सविस्तर पंचनामा पी.एस.आय. तागड यांनी दोन पंचांसमक्ष केला. त्यातील एक १८० मिलीची देशी दारुची बाटली सी.ए. परिक्षणासाठी काढून त्यावर पोलीसांच्या व पंचांच्या सह्यांची कागदी लेबले लावली व ती बाटली सिबलंद केली. त्यानंतर पो.स्टेशनला येवून मी त्या इसमाविरुद्ध कायदेशीर फिर्याद दिली. मला आता मी दिलेली फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्याला **निशाणी २१** देण्यात येते. मला आता मी दिलेली छापील खबर दाखवण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्याला **निशाणी २२** देण्यात येते. पंचनाम्यासाठी संजय जाधव व विठ्ठल गांगुर्डे हे दोन पंच होते. घटनास्थळ व जप्ती पंचनामा माझ्यासमक्ष झाला होता त्यावर पंचांनी माझ्यासमक्ष सही केली होती. मला आता घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्याला **निशाणी २३** देण्यात येते. घटनास्थळ पंचनाम्यावर पी.एस.आय तागड यांची देखील सही आहे. त्यांची सही त्यांच्यासोबत मी काम केल्यामुळे ओळखतो. आरोपीला मी ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. डी.ए. आहेर यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. चिखलआंबे ते वडनेर भैरव पो.स्टेशन साधारणतः १२ किमी अंतरावर आहे. स.पो.नि. मयुर भामरे यांना गुप्त बातमीदारामार्फत नेमकी किती वाजता

माहिती मिळाली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की स.पो.नि. भामरे यांनी त्यांना मिळालेली माहिती आम्हाला नेमकी किती वाजता सांगितली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की वडनेर भैरव ते चिखलआंबे रस्ता कच्चा आहे. वडनेर भैरव पो.स्टेशनपासून चिखलआंबेला साधारणतः १५ ते २० मिनीटात पोहोचता येते. हे म्हणणे खरे आहे की दि.१०.०८.२०२३ रोजी वडनेर भैरव पो.स्टेशनला शासकीय वाहन दिलेले होते व ते शासकीय वाहन पो.स्टेशनच्या आवारात उभे होते. हे म्हणणे खरे आहे की दि.१०.०८.२०२३ च्या पूर्वी मी आरोपीला ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की आरोपी घटनास्थळावरुन पळून गेल्यामुळे घटनेवेळी तोच अवैधरितीने दारु विक्री करत होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की आम्ही जेव्हा घटनास्थळावर छापा टाकण्यासाठी गेलो तेव्हा आम्हाला पाहून इसम तिथून पळून गेला व त्यानंतर लगेचच तो आम्हाला मिळून आला नाही. हे म्हणणे खरे नाही की इसम घटनास्थळावरुन पळून गेल्यामुळे आम्हाला मुद्देमाल बेवारस स्थितीत मिळून आला.

३. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच संजय जाधव व विठ्ठल गांगुर्डे वडनेर भैरव पो.स्टेशनला होमगार्ड आहेत. मला घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की दि.१०.०८.२०२३ रोजी घटनास्थळाजवळ शाळा चालू असल्यामुळे तिथे विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांची गर्दी होती. हे म्हणणे खरे नाही की पंचनाम्यावरील पंच पो.स्टेशनला उपस्थित होते. हे म्हणणे खरे नाही की पंचनाम्यासाठी घटनास्थळावर आम्ही लॅपटॉप, प्रिंटर वगैरे नेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावर जी मोटारसायकल आम्हाला मिळून आली ती कोणाच्या मालकीची होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावर एक इसम ज्या लोकांकडून पैसे घेत असतांना दिसला

त्यांच्याकडून देखील आरोपीबाबत आम्हाला कोणतीही माहिती मिळाली नाही. हे म्हणणे खरे आहे की चिखलआंबे येथील जिल्हा परिषद शाळेला बाहेरुन तारेचे कंपाऊंड आहे. हे म्हणणे खरे नाही की शाळेच्या आवारामध्ये झाडेझुडपे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की शाळेच्या आवाराला जे तारेचे कंपाऊंड आहे त्या आवारातून बाहेर यायचे असल्यास शाळेच्या गेटमधून यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की शाळेचे आवार व शाळेचे गेट यामध्ये मुलांचे खेळण्यासाठी मोकळे मैदान आहे. हे म्हणणे खरे नाही की शाळेच्या कंपाऊंडच्या बाहेर जंगल वगैरे आहे. हे म्हणणे खरे नाही की दि.१०.०८.२०२३ रोजी आम्हाला बेवारस मुद्देमाल मिळून आला व त्यामुद्देमालाच्या आधारे मी आरोपीविरुद्ध खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की वरिष्ठांच्या सांगण्यानुसार कोठा पूर्ण करण्यासाठी मी आरोपीविरुद्ध सदरची खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की दि१०.०८.२०२३ रोजी मी घटनास्थळी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.08.06 15:14:27 +0530

**दि. ०५.०८.२०२५**

**(वृषाली दी. सुंगारे)**

**सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,**

**चांदवड.**